॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३१ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील एक अधिकारी व दहा कर्मचारी दि. ३१ मे रोजी विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाले.

विद्यापीठाच्या संलग्नता विभागातील उपकुलसचिव गजमल पवार, संशोधन विभागातील वरिष्ठ सहायक सुधाकर घुगे, कुलसचिव कार्यालयातील वरिष्ठ सहायक, संजय पाटील, बांधकाम विभागातील वरिष्ठ सहायक संजय महाजन,संलग्नता विभागातील सहायक संतोष चव्हाण, कुलगुरू कार्यालयातील सहायक प्रकाश लंगोटे, बाबुजगजीवनराम मुलींचे वसतीगृहातील सहायक श्रीमती सुनिता अहिरे, सामान्य प्रशासनातील वाहनचालक मन्साराम राठोड, बांधकाम विभागातील कनिष्ठ सहायक पुंडलीक देवरे, ज्ञानस्त्रोत केंद्रातील कनिष्ठ सहायक रविंद्र पाटील, बांधकाम विभागातील कुशल परिचर रघुनाथ पाटील हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत.

सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील व वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. शिवाजी पाटील, प्राचार्य एस.एस. राजपूत, प्राचार्य जगदीश पाटील व अधिष्ठाता एस.टी. भुकन यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३१ मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता